# उत्तररंग उपक्रम आणि वाटचाल

अशोक सप्रे, विद्या हर्डीकर सप्रे

आयुष्याच्या उत्तररंगाचा प्रवास जगातील कोणत्याही माणसाला महत्त्वाचा. तसा तो बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी सदस्यालाही. तेव्हा बृहन्महाराष्ट्र मंडळात याचा विचार करण्यासाठी उपक्रम हवेत आणि विभागही. म्हणूनच १९९१पासूनच्या मराठी अधिवेशनात आम्ही चर्चासत्रे चालवली. २००५पासून ठिकठिकाणी परिषदा घेत असतो.

बृहन्महाराष्ट्र वृत्तात म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मुखपत्रात उत्तररंग हे सदर आम्ही २००४ पासून 200८ पर्यन्त चालवले.

## *उत्तररंग हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा भाग असण्याचे महत्त्वः*

कोणताही उपक्रम सुरू होतो तो काही माणसांच्या प्रयत्नातून. नन्तर त्याचा विस्तार होतो, आवश्यकतेनुसार संस्थेत रूपांतर होते . अनेक संस्थांच्या यादीत आणखी एका संस्थेची भर घालण्यात आम्हाला काही अर्थ वाटत नव्हता. म्हणून हा उपक्रम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या छत्राखाली यावा यासाठी आमचे प्रयत्न सुरू होते. त्यामुळे आमच्या कामात फार मोठा फरक होणार होता असे नव्हे. हे काम आम्ही व्यक्तिगत फायद्यासाठी करत नसल्यामुळे आम्हाला यातून काहीही लाभ होणार नव्हता. उलट बृहन्महाराष्ट्र मंडळाला एक उपक्रम कार्यकर्त्यांसह सहज जोडला जात होता. या कामामुळे आम्हाला माणसांचा लोभ मिळतो तो आहेच. समाजमान्यता वगैरे गोष्टींच्या आम्ही केव्हाच पलीकडे गेलो आहोत खरं सांगायचं तर अशी कामे म्हणजे इंग्रजीत ज्याला "थँकलेस जॉब" म्हणतात, तोच प्रकार असतो. मग ही धडपड कशासाठी ? तर मराठी समाजाला यातून जास्तीत जास्त फायदा मिळण्यासाठी. संस्थेच्या माध्यमामुळे जास्तीत जास्त माणसांपर्यंत लवकर पोहोचता येते. या कामासाठी आणखी चार माणसे मिळण्याची शक्यता वाढते. संस्थेचे पाठबळ असेल, तर दुसऱ्या संस्थांपर्यंत लवकर पोहोचता येते. सरकारी संस्थांकडून मदत मिळण्याची शक्यता वाढते. तेव्हा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीने "उत्तररंग"या विषयाबद्दल ची आमची दार्शनिकता म्हणजे व्हिजन समजावून घेऊन हा उपक्रम कामाचा भाग म्हणून सामावून घेणे महत्त्वाचे. त्यासाठी कार्यकारिणीच्या सदस्याची नेमणूक आणि त्यातून कार्यकर्त्यांचा संच निर्माण होणे हे आवश्यक. बृहन्महाराष्ट्र मंडळ हा मराठी समाजाशी निगडित अशा कोणत्याही उपक्रमासाठी असलेला मंच आहे. मंडळावर मराठी निवृत्तांसाठी वसाहती बांधण्याची जबाबदारी नाही. परंतु उत्तररंग या विषयाबद्दल बोलणारे, एकत्र जमणारे, काही उपक्रम करणारे जे गट गावोगावी आहेत, त्यांना एकत्र येण्याची संधी देणे, याबद्दल गावोगावच्या मराठी मंडळांना सांगणे, त्यांच्या मंचावर असे उपक्रम करण्यास उत्तेजन देणे ( अँडव्होकसी), अधिवेशन समितीला या विषयावर मेळावे करण्यास उद्युक्त करणे ही मंडळाच्या त्या त्या वेळच्या समितीची जबाबदारी आहे. यातून निर्माण होते ती "व्हर्च्युअल" उत्तररंग वसाहत ! होते "नेटवर्किंग"!

कार्यकारिणीतल्या लोकांशी बोलणी सुरू होती. श्वेतपत्रिका झाल्या, चर्चा झाल्या. पण गाडी त्यापुढे सरकत नव्हती. तेव्हा " आपल्याला जमेल तेवढे काम करत रहावे. बृहन्महाराष्ट्र मंडळाला पटायचे तेव्हा पटो " असे ठरवून आमच्या परिषदा चालू होत्या. वसाहतींची माहिती मिळवणे, भेटी देणे आणि लोकांना आवश्यकतेनुसार मदत करणे चालू होतेच.

## *२०१२ नंतरची वाटचालः*

२००८मध्ये हे सदर "आता आपण करणे पुष्कळ झाले.. वाचकांना जरूर भासलीच तर ते तसे कळवतील." असे ठरवून आम्ही ते बंद केले होते. त्यानंतर २०११च्या नोव्हेंबरमध्ये बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या संपादकांनी उत्तररंग हे सदर वृत्तात पुनः सुरू करण्याची विनंती केली. या सदराची आवश्यकता आणि संपादकांच्या विनंतीचा मान या दोन्हीचा विचार करून ते सदर सुरू करावे असे ठरले, परंतु केवळ वृत्तात सदर असणे पुरेसे नव्हते. आता संपादकांप्रमाणेच बृहन्महाराष्ट्र मंडळानेही त्यापुढे काही पावले टाकली पाहिजेत, तरच यासाठी दिलेल्या वेळाचा उपयोग ! म्हणून आम्ही सध्याचे अध्यक्ष श्री. चोघुले यांना दूरध्वनी केला. त्यांनी या सदरासाठी आपला पाठिंबा लगेच जाहीर केला.

२०१२मध्ये हे सादर आम्ही पुन: सुरु केले, ते बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांच्या आणि वृत्त संपादकांच्या विनंतीवरून!
बृहनमहाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र असलेल्या वृत्तात. संपादक, अध्यक्ष आणि उत्तररंग ही चळवळ आहे हे मानणारे आमच्यासारखे कार्यकर्ते हे एकाच विचाराच्या पातळीवर आले. त्यानंतर गेल्या वर्षात "उत्तर रंग"ची बरीच वाटचाल झाली.

एक म्हणजे या सदरात माहिती देणारे आणि विचार करायला लावणारे विषय आम्ही हाताळले.
दुसरी वाटचाल म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांबरोबर सुरु झालेला संवाद! आपल्या आयुष्याचा पन्नाशी नंतरचा भाग महत्वाचा आहे, व्यक्ती म्हणून तसा समाज म्हणून ! त्यासाठी "उत्तररंग" हा बृहन महाराष्ट्र मंडळाचा भाग असला पाहिजे हे समजावून घेऊन श्री. आशिष चौघुले यांनी काही पावले टाकली आहेत. त्यामुळे
पुढील पाच उपक्रमांना गती मिळाली,.

१. मंडळाच्या वेब साइटवर विभाग,

2. बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तररंगविभागाच्या वतीने काही गावात परिषदा

3. **उत्तररंग गुगल ग्रुप** (uttarrang)

4. येत्या अधिवेशनात "उत्तर रंग" विभागाचा परिसंवाद,

5. आणि "उत्तररंग (५५ प्लस लोकांची )" नामदर्शिका हे काही उपक्रम.

बृहन महाराष्ट्र मंडळाने उत्तररंगविभागाच्या उपक्रमांसाठी मंच दिला आहे. त्याचां लाभ घेण्यासाठी आपण सर्वानी या उपक्रमात भाग घेतला पाहिजे.

बृहन्महाराष्ट्र मंडळा चा **उत्तररंग गुगल ग्रुप** (uttarrang)त्यासाठीच आहे. भाग घेण्यासाठी
ई मेल.(ashoksapre@gmail.com)

२०१३ च्या अधिवेशनात उत्तररंग (५५ प्लस लोकांची ) नामदर्शिका श्री. मोहन रानडे यांच्या नेतृत्वाखाली प्रसिद्ध होणार आहे. या नामदर्शिकेत ५५ वयाच्या वरील लोकांसाठी उपयुक्त माहिती व लेख असतील.

## उत्तररंग परिषदाः

**उत्तररंग** विभाग केवळ वयस्कर लोकांसाठी नसून सर्व वयाच्या लोकांसाठी आहे. कारण प्रत्येकालाच आयुष्याच्या उत्तर रंगाची तयारी आणि नियोजन करावे लागते. जेवढे लवकर करावे तेवढे चांगले!
आपण सगळेच त्या साठी माहिती मिळवत असतो. वृत्तपत्रे, मासिके, महाजालावरील संकेत स्थळे (म्हणजे वेबसाइटस), विविध विषयाचे सल्लागार, जाहिराती यातून माहिती भरभरून ओसंडत असते. अशावेळी हे परिसंवाद आणि परिषदा कशाला ? असा प्रश्न स्वाभाविक आहे.(त्यातून आपण मराठी लोक पडलो सर्वज्ञानी ! ) त्याचे उत्तर लॉस

एन्जेलिस व ऑस्टिन येथील परिषदात मिळेल. आयुष्याच्या “उत्तररंगातील यशस्वी जीवनासाठी नियोजन” हा यां परिषदांचा विषय आहे. हे जीवन यशस्वी होण्यासाठी आपल्याला उपलब्ध असलेली माहिती, आपल्याकडे असलेली साधने (‘रिसोर्सेस’), आपल्या आकांक्षा, आणि त्या पूर्ण करण्यासाठी आपण काय कृती करू शकतो यां सर्वांचा समन्वय घालावा लागतो. अमेरिकेत राहताना दोन संस्कृतीचा समन्वय साधणेही महत्वाचे. तेव्हा त्या दृष्टिकोनातूनही यां नियोजनाचा विचार करावा लागतो.

उदाहरणार्थ: आपल्याला असणारा वेळ, पैसा, आपले आरोग्य, आपली नातीगोती, आपले भावनिक बळ अश्या काही गोष्टी म्हणजे आपली साधने. आपल्याला कशी जीवनाशैली हवी, आयुष्यात काय काय करायचे आहे, हे सर्व म्हणजे आपल्या आकांक्षा, त्यांच्या परिपूर्ती साठी आपण काय कृती करणार, केव्हा करणार, कसे करणार याचा विचार आणि चर्चा या परिषदात होईल.

लॉस एन्जेलिसची परिषद बृहन महाराष्ट्र मंडळ आणि जैन सेंटर यांनी १६ मार्चला आयोजित केली आहे. मराठी मंडळ लॉस एन्जेलिसही यासाठी मदत करत आहे. ऑस्टिन येथील परिषद बृहन महाराष्ट्र मंडळ आणि ऑस्टिन मराठी मंडळ यांनी ६ एप्रिलला आयोजित केली आहे. दोन्ही परिषदा सर्व भारतीयांसाठी खुल्या आहेत. मराठी मंडळांच्या संकेत स्थळावर माहिती आहे. फिनिक्स मराठी मंडळाच्या प्रतिनिधींसमवेतही अशा प्रकारच्या परिषदेची बोलणी सुरू आहेत. न्यूजर्सीतील ५५ प्लस गटाचे कार्यकर्ते न्यूजर्सीत अशी परिषद भरवण्याच्या खटपटीत आहेत.

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन आणि उत्तररंगः

अधिवेशन ही आपल्या सर्वांना एकत्र येण्याची मोठी संधी. म्हणूनच २०१३च्या अधिवेशनात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने उत्तररंग विषयक मेळावा, तसेच परिसंवाद, माहितीसत्र,चर्चासत्र यांची योजना चालू आहे.

पूर्वीही असे परिसंवाद आम्ही व आमच्यासारख्याच आमच्या मित्रांनी मिळून केले होते. मुळात या आणि आणखी काही विषयावर चर्चासत्रे करण्याची आवश्यकता अधिवेशनाच्या समित्यांना वाटावी लागते. नाहीतर अशा सत्रांना करमणुकीच्या कार्यक्रमांबरोबर स्पर्धा करावी लागते एका अधिवेशनात अर्ध्या दिवसाची परिषद आयोजित करण्याचा प्रयत्न केला. ही अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होती. चांगली झाली. परंतु बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिष्ठान नसणे आणि अधिवेशन समितीने त्याची प्रसिध्दी न करणे यामुळे पुष्कळ लोकांना समजलेच नाही ! समजल्यावर लोक हळहळले. जवळ जवळ वीस लोकांनी यासाठी भरपूर कष्ट घेतले होते, त्यांना वाटले की आपले प्रयत्न फक्त शंभरदीडशे लोकांपर्यंतच पोहोचले.

या वर्षी उत्तररंगाचे उपक्रम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मंचावरून होणार आहेत. अध्यक्षांचा पाठिंबा आहे आणि अधिवेशन समितीच्या वेळापत्रकात उत्तररंगाला स्थान मिळते की नाही या आशेवर रहाण्याची आवश्यकता नाही.

हे सर्व आता बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने होणार असल्यामुळे बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी असलेले राखीव दालन उत्तररंगविषयक उपाक्रमांसाठी उपलब्ध असेल. ( भाग घेण्यासाठी, विषय सुचवण्यासाठी संपर्क साधा. दूरध्वनी :५६२ ४४१ ६३०० इमेल: ashoksapre@gmail.com )

## अधिवेशनात एकत्र येण्याने काय साध्य होईल ?

१. मुख्य म्हणजे गावोगावी उत्तरंगविषयक म्हणजे ५५ वयाच्या वरच्या लोकांसाठी जे गट काम करत आहेत त्यांना एका मंचावर येण्याची संधी मिळेल. कल्पना आणि उपक्रमांची देवाणघेवाण होईल.

२. अशा गटांमध्ये सतत संवाद कसा राहील व ही देवाण घेवाण सुरू ठेवण्यासाठी "नेटवर्क" कसे करावे याचा विचार होईल.

३. यातून लोकांसाठी अधार यंत्रणांचा ( सपोर्ट सिस्टिम्स) वापर होण्याच्या शक्यतेचा विचार होईल. लोकांना आपल्या उत्तरायुष्याचे नियोजन करण्याची प्रेरणा मिळेल.

अर्थातच अधिवेशन समितीने याला प्रसिध्दी देणे आणि मुख्य म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांनी "उत्तररंग" उपक्रमाला " आपले " म्हणजे ( ओनरशिप घेणे) मान्यतेचे जाहीर शिक्कामोर्तब करणे ( एन्डॉर्समेंट) आणि उत्तररंगाबद्दल बोलणे ( अॅडव्होकसी) हे महत्त्वाचे आहे. मग ते अध्यक्ष कोणीही असोत आणि कोणत्याही वर्षीचे असोत.

## उत्तररंग भावी दिशाः

उत्तररंगाचे भावी चित्र काय असेल ? तर गावोगावच्या मराठी मंडळांनी "उत्तररंग" या उपक्रमाचा स्वीकार करणे, आणि मराठी मंडळाच्या वतीने उत्तररंगाचे कार्यक्रम, परिषदा, माहिती सत्रे, नेटवर्क, गावातील लोकांना उत्तरायुष्यातील अडीअडचणी निभावण्यासाठी मदत यांचे आयोजन करणे !

मराठी मंडळांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मंचावर एकमेकांशी संपर्क राखणे आणि कल्पनांची देवाघेवाण करणे!

मराठी मंडळे आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने मग उ. अमेरिकेच्या विविध भागात स्वतंत्र परिषदा आणि माहिती सत्रे घेता येतील.

सुदैवाची गोष्ट अशी की काही मराठी मंडळांना हे चित्र दिसते आहे. मंडळाच्या कार्यकारिणीवर असणारी तरुण मंडळी " हे फार दूर आहे, आपण तरुण आहोत.." असे न म्हणता उत्तररंगविषयक कार्यक्रम करू लागले आहेत. ऑस्टिन मराठी मंडळ आणि फिनिक्स मराठी मंडळ ही दोन ठळक उदाहरणे !

## उत्तररंग आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे संकेतस्थलः

या संकेतस्थलावर , उत्तररंग विभागात आम्ही **उत्तरायुष्यासंबंधी** विविध विषयांवरचे माहितीप्रद लेख प्रसिध्द करणार आहोत.

काही संकेतस्थले या विषयावरील माहिती देत असतात, त्या संकेतस्थलांचे धागे (म्हणजे वेबसाईट लिंक्स) येथे देऊ.

अमेरिकेतील आणि महाराष्ट्रातील उत्तररंग वसाहतींची माहिती येथे प्रसिध्द करण्यात येईल.

कोणाला माहिती अथवा लेख पाठवायची इच्छा असेल तर संपर्क साधाः ashoksapre@gmail.com

येथे प्रसिध्द होणारा लेख जर पूर्वी प्रसिध झाला असेल तर तसा उल्लेख असणे महत्त्वाचे आणि ती माहिती पुरवण्याची जबाबदारी लेखकाची राहील. तसेच येथे प्रसिध्द होणारा कोणताही मजकूर अन्यत्र प्रसिध्द करण्यासाठी बृहन्महाराष्ट्रमंडळाची लेखी अनुमती घेणे आवश्यक.

लेख व माहिती प्रसिध्द करण्याविषयीचे सर्व निर्णय बृममंकडे असतील. लेखाचे संपादन करण्याचे सर्व अधिकार बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या उत्तररंग समितीकडे असतील. लेखातील प्रसिध्द झालेल्या मतांशी बृममंचे उत्तररंग समितीचे कार्यकर्ते , बृममंच्या कार्यकारिणीचे सभासद सहमत असतीलच असे नाही. तसेच माहितीची सत्यता पडताळून पहाण्याची जबाबदारी बृहन्महाराष्ट्र मंडळावर नाही.

--अशोक सप्रे, विद्या हर्डीकर सप्रे

( फेब्रुवारी,१६,२०१३)